महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१

दूरध्वनी क्र: ०२२-२२०१३५७८ **Email ID : soyojana11.rdd-mh@nic.in**

---

क्रमांक-मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२ /यो-११ दिनांक :- २६ डिसेंबर, २०२५

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

**विषय- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी व प्रचार प्रसिद्धी बाबत सूचना.**

**संदर्भ-** १. विभागाचे समक्रमांकित पत्र दि.१६.१०.२०२५
२. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे अध्यक्षतेखाली दि.२४.१२.२०२५ रोजी झालेली आढावा बैठक.

महोदय,

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने मा.मंत्री (ग्रामविकास) यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीत सविस्तर मार्गदर्शन केलेले आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

## १. अभियानाच्या वॉर रुम बाबत :-

१. अभियानाच्या प्रचार प्रसिद्धीसाठी स्वतंत्र कक्ष (War Room) तयार करण्याच्या सूचना संदर्भ क्र.१ च्या पत्राद्वारे देण्यात आल्या होत्या, तथापि अद्याप काही जिल्हा परिषदांनी स्वतंत्र कक्ष स्थापन न केल्याचे निदर्शनास आले आहे. तरी प्रत्येक जिल्हा परिषदेमध्ये तात्काळ वॉर रूम स्थापन करावा.
२. सदर वॉर रुम एक केंद्रीकृत निरीक्षण, विश्लेषण व निर्णय सहाय्य केंद्र म्हणून काम करेल.
३. वॉर रुम स्थापनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:-
   - अभियानाच्या प्रचार - प्रसिद्धीवर केंद्रित नियंत्रण व समन्वय
   - ग्रामपंचायतनिहाय प्रगतीचे दैनंदिन परीक्षण
   - सोशल मीडिया, युट्यूब लाईव्ह, फोटो/व्हिडिओ संकलन व प्रसिद्धी
   - जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत यांच्यातील समन्वय
   - जनजागृती उपक्रमांचे दस्तऐवजीकरण
४. वॉर रुमबाबत क्षेत्रीय स्तरावरील अद्यायावत माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी यांना सादर करण्यात येईल.
५. सदर वॉर रुम मार्फत ग्रामपंचायत स्तरावरील कामांची दैनंदिन प्रगतीचे निरीक्षण केले जाईल तसेच जिल्हा ते राज्य स्तरावर एकसंध समन्वय साध्य करण्यात यावा.

६. वॉर रुमकरिता स्वतंत्र खोली (किमान ३०० - ५०० चौ.फुट) त्यामध्ये हाय स्पीड इंटरनेट, संगणक/लॅपटॉप, मोठी एलईडी स्क्रीन इत्यादी सुविधा असाव्यात.

७. वॉर रूमकरिता उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी.

**८. वॉर रूमसाठी नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती खालील Google Spread sheet मध्ये दि.३१.१२.२०२५ पूर्वी भरणे बंधणकारक राहील.**

**Spread sheet link - https://docs.google.com/spreadsheets/d/1uSjuvsMd2suI94y5-2-ziU5rV8XEy8g8wH0I81EaduY/edit?gid=221751289#gid=221751289**

९. सदर Spread sheet मधील माहिती जिल्हा परिषदेसाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यापेक्षा कनिष्ठ नसलेले अधिकारी व पंचायत समितीसाठी गटविकास अधिकारी यांनीच भरावी व माहितीखाली आपले नाव, पदनाम व भ्रमणध्वनी नमुद करावे. सदर माहिती गोपनीय राहील याची दक्षता घ्यावी.

१०.वॉर रुम मधून दररोज कमीत कमी २ ते ३ बातम्या/यशोगाथा प्रसिद्धीसाठी पाठविण्यात याव्यात.

११. अभियान वॉर रूम हे जिल्हा परिषदेसाठी एक रणनीतिक प्रशासकीय साधन असून यामुळे अभियानाची गती, गुणवत्ता, पारदर्शकता व परिणामकारकता यामध्ये लक्षणीयरित्या वाढ होण्यास मदत होईल.

## २. सेलिब्रिटी समन्वय :-

१. दि.०१.०१.२०२६ पासून सेलिब्रिटींचा गाव भेटींचा कार्यक्रम सुरू होणार आहे. त्याकरिता अभियानाचे काम उत्कृष्टरित्या चालू असलेल्या ५ ग्रामपंचायतींची यादी प्राधान्याने शासनास सादर करावी.

२. सेलिब्रिटींच्या गावभेटीला कार्यक्रमाचे स्वरूप देवून ग्रामपंचातीच्या ठिकाणी स्टेज, स्क्रीन, साउंड सिस्टीम इत्यादीची व्यवस्था करून यशस्वीरित्या नियोजन करावे.

३. सेलिब्रिटींसोबतच्या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (यापेक्षा कनिष्ठ नसलेले अधिकारी) तसेच गट विकास अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

४. प्रत्येक कार्यक्रमांनतर त्याची जाहिरात, प्रचार व प्रसिद्धी तात्काळ करण्यात यावी.

## ३. अभियान गीत:-

१. अभियान गीतामुळे अभियानाची ओळख सर्वदूर पोहोचणार आहे. त्यामुळे अभियानाशी संबंधित सर्व Reels/Videos साठी तसेच ग्रामसभांसाठी कार्यक्रमापूर्वी, कार्यक्रमात व कार्यक्रमांनतर अधिकृत अभियान गीताचाच वापर करावा.

२. अभियानाचे गीत हे सोपे, समजण्यासारखे, गावकेंद्रित, प्रेरणादायी संदेश देऊन लोकांमध्ये आपलेपणा व सहभागी भाव निर्माण होईल. यामुळे अभियान राज्यभर एकसमान व सातत्यपूर्ण स्वरूपात पोहोचण्यास मदत होईल.

## ४. सोशल मिडिया प्रचार प्रसिद्धी :-

१. ग्रामविकास विभागाच्या अधिकृत चॅनलवर अभियानाच्या जागृतीबाबत Reels/Videos नियमितपणे शेअर केले जातात. सदरचे Reels/Videos आपल्या संबंधित अधिकारी/अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर शेअर करावेत.

२. विशेषत: सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांनी सदर Videos व्हॉट्सॲप स्टेटसला ठेवून अभियानाची जनजागृती करावी.

## ५. क्षेत्र भेटी व सोशल मिडिया हॅन्डल्स :-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आठवड्यातून जिल्ह्यातील किमान ५ गावांना व गट विकास अधिकारी यांनी आठवड्यातून तालुक्यातील किमान १० गावांना भेट द्यावी.
२. सदर भेटीच्या अनुषंगाने केलेल्या कृतीचे फोटो/व्हिडिओ जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकृत इन्स्टाग्राम, फेसबुक व युट्युब चॅनलवर अपलोड करावी.
३. ज्या जिल्हा परिषद/पंचायत समित्यांनी अद्याप सोशल मिडिया हॅन्डल्स सुरू केलेले नाहीत त्यांनी तात्काळ सुरू करावेत.
४. **आठवड्याच्या भेटींची संख्या, छायाचित्रे व व्हिडिओ लिंक याची माहिती** Google Form **मध्ये नियमित भरावी.** Google Form **link** :-
**https://docs.google.com/forms/d/1jdqVpuqGGUWGGTTD8c0LcsuLExokdSy26_9S9LdAgus/edit#responses**
५. दि.०१.०१.२०२६ पासून अभियानाचा लोगो असलेली बॅच परिधान करणे बंधनकारक राहील.

सन २०२५-२६ या वर्षाकरिता अभियानाच्या IEC व प्रसिद्धी साठी प्रति जिल्हा परिषद रु.४०.०० लक्ष व प्रति पंचायत समिती रु.३.०० लक्ष याप्रमाणे निधी शासनामार्फत देण्याचे, ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र:- मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२(E-११२३०५७)/यो-११, दि.०६ ऑगस्ट, २०२५ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार उपरोक्त मर्यादेत खर्च करण्याबाबत कार्यवाही करावी.वित्त विभागाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतर या आर्थिक वर्षात वितरीत करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही तात्काळ सुरू करून व अभियानास प्रथम प्राधान्य देवून अभियान यशस्वी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

**आपला,**

**(सागर मनोरे)**
**कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन**

प्रत: निवडनस्ती यो-११.